-प्रेसनोट दि. १३/०४/२०१९

## निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सराईतांकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा गुन्हे शाखेकडून हस्तगत.

सध्या महाराष्ट्रात सुरू असलेल्या लोकसभा-२०१९ निवडणुक प्रचाराचे वारे जोरात वाहत असताना पुणे शहरातील कायदा व सुव्यवस्था आबाधित राखण्याबाबत मा. पोलीस आयुक्त श्री. डॉ. के. व्यंकटेशम यांनी अवैध शस्त्र बाळगणारे व विक्री करणारे सराईत गुन्हेगारांवर लक्ष्य केंद्रीत करून कडक कारवाई करणेबाबत आदेश पारित केलेले होते. सदर आदेशाप्रमाणे कारवाई करत असताना गुन्हे शाखा, युनिट-२ येथे नेमणुकीस असणारे पोलीस नाईक यशवंत खंदारे यांना त्यांचे गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, **रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे मनोज धोत्रे हा पिस्टल विक्री करणेकामी स्वारगेट एस टी स्टॅंडमागील कॅनॉल रोडवर येणार आहे.** अशी बातमी मिळताच युनिट-२ चे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री गजानन पवार यांनी सपोनि श्री लक्ष्मण ढेंगळे यांचे नेतृत्त्वाखाली एक पथक तयार करून त्यांना कारवाई करणेकामी योग्य त्या सूचना व आदेश देवून रवाना केले असता मिळाले बातमीप्रमाणे दिनांक ०८/०४/२०१९ रोजी सराईत गुन्हेगार नामे मनोज विलास धोत्रे वय ३४ रा. मुळ रा मच्छी मार्केट समोर, स नं १११, वडारवस्ती, विश्रांतवाडी, पुणे व सध्या रा. मु. पो. डोणजेगाव, सिंहगड रोड, ता. हवेली, जि. पुणे यास सापळा लावून पकडले असता त्याचे ताबेतून एक गावाठी पिस्टल व दोन जीवंत राऊंड जप्त करणेत आले. त्याचेविरुध्द स्वारगेट पोलीस ठाणे येथे २२१/२०१९ आर्म ॲक्ट कलम ३,(२५), ५(२५) तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)सह १३५ प्रमाणे गुन्हा नोंद करून तपास केला असता त्याने सदरचे पिस्टल विक्री करीता सराईत व कुख्यात गुन्हेगार नामे मोहसीन ऊर्फ मोबा शेख रा. येरवडा याचेकडून प्राप्त केले असलेबाबत व तो सध्या जाधववस्ती, वाघोली भागात असलेबाबत माहिती दिली असता लागलीच तात्काळ त्याला ताबेत घेणेबाबत पथक रवाना झाले व त्याचा शोध घेवून त्यास ताबेत घेतले असता त्याचे अंगझडतीत एक गावठी पिस्टल व दोन जीवंत राऊंड तसेच त्याने पाळलेल्या कबुतरांचे ढाबळीचे शेडमध्ये लपवून ठेवलेले एक गावठी पिस्टल व दोन जीवंत राऊंड असे मिळून एकूण दोन गावठी पिस्टल व चार जीवंत राऊंड जप्त करणेत आले आहेत व त्याला दाखल गुन्ह्याचेकामी अटक करणेत आले आहे. अटक आरोपींची मा कोर्टातून दिनांक १२/०४/२०१९ पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड घेणेत येवून त्यांचेकड केले तपासात मोहसीन ऊर्फ मोबा याने सेंदवा, मध्यप्रदेश येथून पिस्टल खरेदी करून ते पुणे शहरात विक्री करणेकरीत मनोज धोत्रे यास दिले असल्याचे सांगितलेने एक पथक लागलीच मध्यप्रदेश येथे शोध घेणेकामी गेले असता शस्त्रविक्री करणारा गुन्हेगारचा शोध घेतला असता तो मिळून आलेला नाही, त्याचा शोध घेणेबाबत कारवाई सुरू आहे. दरम्यान मनोज धोत्रे याने मोहसीन ऊर्फ मोबा याचेकडून विक्री करीता घेतलेली आणखी दोन गावठी पिस्टल व तीन जीवंत राऊंड विश्रांतवाडी येथील पत्र्याचे चाळीतील खोलीत लपवून ठेवलेले काढून दिले आहेत.

अश्याप्रकारे स्वारगेट पोलीस ठाणे गुरनं २२१/२०१९ आर्म ॲक्ट कलम ३,(२५), ५(२५) तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)सह १३५ प्रमाणे दाखल गुन्ह्यात अटक आरोपी नामे १. मनोज विलास धोत्रे वय ३४ रा. मुळ रा मच्छी मार्केट समोर, स नं १११, वडारवस्ती, विश्रांतवाडी, पुणे व सध्या रा. मु. पो. डोणजेगाव, सिंहगड रोड, ता. हवेली, जि. पुणे व २. मोहसीन ऊर्फ मोबा बडेसाब शेख वय ३६ रा. स नं १२, दरबार बेकरीजवळ, पर्णकुटी पायथा, येरवडा, पुणे यांचेकडून त्यांनी सेंदवा, मध्यप्रदेश येथून तस्करी करून आणलेली एकूण ०५ गावठी पिस्टल ०९ जीवंत राऊंड असे किं रु. १,५१,८००/- चा मुद्देमाल जप्त करणेत आलेला आहे. वर नमूद आरोपी हे सराईत गुन्हेगार असून आरोपी क्र. १ मनोज धोत्रे याचेविरुध्द शरीराविरुध्द व मालमत्तेविरुध्द एकूण ०४ गुन्हे वेगवेगळ्या पोलीस ठाणेत नोंद असून आरोपी क्र ०२ मोहसीन ऊर्फ मोबा शेख याचेविरुध्द खून, गंभीर दुखापत व शस्त्र अधिनियमाद्वारे एकूण ०९ गुन्हे दाखल असून येरवडा परिसरात त्याची मोठी दहशत आहे.

सदरची कामगिरी पोलीस उप आयुक्त श्री शिरीष सरदेशपांडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्री समीर शेख, पोलीस निरीक्षक श्री गजानन पवार, सहा. पोलीस निरीक्षक श्री लक्ष्मण ढेंगळे, श्री जयवंत जाधव, सहा. पोलीस फौजदार श्री यशवंत आंब्रे, पोलीस हवालदार अजय खराडे, अस्लमखान पठाण, पोलीस नाईक यशवंत खंदारे, मोहसीन शेख, अतुल गायकवाड, विशाल भिलारे, उत्तम तारू पोलीस शिपाई अजित फरांदे, मितेश चोरमोले, गोपाल मदने, कादिर शेख यांचे पथकाने केलेली आहे.


Crime Branch Unit 2, Pune City